आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे सामाजिक सुरक्षा योजनांची नोंदणी पुन्हा सुरू

आ.मुनगंटीवार यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्र्यांनी दिले होते महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना कार्यवाहीचे निर्देश

NSAP पोर्टलवरील तांत्रिक अडचण दूर; वृद्ध, विधवा व दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा

आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे मानले आभार

चंद्रपूर : केंद्रपुरस्कृत सामाजिक सुरक्षा योजनांच्या नोंदणीदरम्यान NSAP (National Social Assistance Programme) पोर्टलवर निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीमुळे वृद्ध, विधवा आणि दिव्यांग लाभार्थ्यांची नोंदणी रखडली होती. ही गंभीर बाब लक्षात घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे तातडीने पाठपुरावा केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिवांना त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पोर्टलवरील तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या असून, सामाजिक सुरक्षा योजनांची नोंदणी पुन्हा सुरू झाली आहे. त्यामुळे हजारो पात्र लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

बंद झालेल्या नोंदणी प्रक्रियेमुळे इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या महत्त्वाच्या योजनांपासून अनेक पात्र लाभार्थी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. नोंदणी होत नसल्याने नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत होत्या आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.

ही बाब आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सविस्तर निवेदन सादर करून NSAP पोर्टलवरील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिवांना त्वरित आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर प्रशासनाने तत्काळ हालचाली करत तांत्रिक अडचणी दूर केल्या असून, सामाजिक सुरक्षा योजनांच्या नोंदणीची प्रक्रिया पुन्हा सुरू झाली आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना आता कोणत्याही अडथळ्याविना अर्ज सादर करून योजनांचा लाभ घेणे शक्य होणार आहे.

याबाबत समाधान व्यक्त करत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, "शासनाच्या प्रत्येक कल्याणकारी योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे हीच आपली भूमिका आहे. पात्र लाभार्थी केवळ तांत्रिक अडचणींमुळे योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी हा पाठपुरावा करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या विषयाची तातडीने दखल घेऊन आवश्यक निर्देश दिल्यामुळे हजारो गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सामाजिक सुरक्षा योजनांची नोंदणी पुन्हा सुरू झाली असून, चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील हजारो पात्र वृद्ध, विधवा आणि दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे शासनाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ आता अधिक सुलभ आणि प्रभावीपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

f Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 1910/मा/म/२८

दिनांक : 20.03.2026

अ.मु.स. मदमाठ
गपाधा कार्यवाही करावी

प्रति,

मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई - 32

सप्रेम नमस्कार,

विषय : केंद्रपुरस्कृत सामाजिक सुरक्षा योजनांची नोंदणी करताना NSAP पोर्टलवर येणाऱ्या अडचणींबाबत तातडीने उपाययोजना करण्याबाबत.

महोदय,

मा. तहसीलदार, संगयो म.न.पा. क्षेत्र, चंद्रपूर यांचे कार्यालयीन पत्र क्रं.कावि/मह.सहा./संगायो मनपा क्षेत्र/2025/31 दि. 08.09.2025 पत्रांन्वये केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा योजनांची नोंदणी करताना NSAP(National Social Assistance Programme) पोर्टलवर तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना यांसारख्या महत्त्वाच्या योजनांची नोंदणी ऑनलाइन करताना प्रणालीमध्ये अडथळे निर्माण होत असल्यामुळे पात्र लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळण्यास विलंब होत आहे. त्यामुळे नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांचे फेरे मारावे लागत असून प्रशासनालाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

वरील बाबींचा गांभीर्याने विचार करून संबंधित विभागामार्फत NSAP पोर्टलवरील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून, आवश्यक मार्गदर्शक सूचना जिल्हा प्रशासनास देण्यात याव्यात, अशी विनंती त्यांनी केली आहे. कृपया याबाबत पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता संबंधीतांना आदेश प्रदान करण्यात यावे, अशी विनंती मी आपणास करीत आहे.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.
योग्य सहकार्याची अपेक्षा
सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

1 मा. तहसीलदार, संगयो म.न.पा. क्षेत्र, चंद्रपूर
2 सौ. सविता प्रलय सरकार, नगरसेविका, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
रा. क्रिष्णा नगर, मुल रोड, एम.ई.एल. प्रभाग क्र. 3, चंद्रपूर जि. चंद्रपूर. मो.नं.9028693192